# महडचा श्री वरद विनायक

## समृद्धी व यश देणारा

महडगावी वरदमूर्ती | करी कामनांची पूर्ती |
गृत्समदे केली कीर्ती | गणनांत्वा गणपतीम् ||



### श्री क्षेत्र महड :

महडचा वरदविनायक हा अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे. रायगड जिल्ह्यातील महड हे पुणे - मुंबई राष्ट्रीय महामार्गावर असून खोपोली व खालापूर दरम्यान हाळ या गावाजवळ आहे. गणेश येथे वरदविनायक - समृद्धी व यश देणारा या स्वरुपात राहत असे.

## महत्त्व :

इ. स. १६९० मध्ये धोंडू पौडकर नामक भक्ताला स्वप्नात देवळाच्या मागील तळ्यात पाण्यात पडलेली मूर्ती दिसली. त्याप्रमाणे त्याने शोध घेतला व त्याला अखंड दगडाची मूर्ती सापडली. त्याने तिची स्थापना तळयाजवळच्या कोनाडयात केली. त्यावर इ.स. १७२५ साली हे देऊळ बांधण्यात आले. १८९२ सालापासून आजतागायत या देवळातला नंदादीप अखंडितपणे तेवत आहे. या देवळास पेशव्यांनी बरीच मदत वेळोवळी केली आहे.

गणपतीच्या पूर्वेस १७३८ साली हरिहर गोसावी यांनी जिवंत समाधी घेतली होती. तपश्चर्या करण्याकरिता हे स्थान सर्वस्वी अनुकूल आहे. सभोवतालचा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य आहे.

२४ ऑक्टोबर १९९६ रोजी नांदीश्राद्ध, पुण्याहवाचन, अघोर होम करुन श्री मूर्तीचे कवचावतरण करण्यात आले व कवच काढीत असताना उजव्या पायाजवळ सिंहासनाचाच भंग झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर २५ ऑक्टोबर १९९६ रोजी नूतन मूर्तीची स्थापना करण्यात आली. पायाजवळ भंग झालेल्या पूर्वीच्या मूर्तीचे विसर्जन करुन, सांप्रत ती मंदिराच्या बाहेरच बाजूला ठेवण्यात आली आहे.

## वरद विनायकाचे देवालय :

महडच्या वरद विनायकाचे देवालय हे स्वयंभू स्थान असून त्याला मठ असेही म्हणतात. पेशवे काळात इ. स. १७२५ मध्ये कल्याणचे सुभेदार रामजी महादेव भिवळकर यांनी येथे हे मंदिर बांधले गेले व महड गावही वसवले.

श्री. वरदविनायकाचे मंदिर हे पुर्वाभिमुख असून लांबून एखाद्या कौलारू घराप्रमाणे दिसते; परंतु, आतून ते उत्कृष्टपणे कोरलेल्या दगडाचे आहे. देवळाच्या चारही बाजूंना हत्तीच्या दोन दोन मूर्ती कोरलेल्या आहेत. उत्तर दिशेला गोमुख असून त्यातून तीर्थ खाली पडते. याच बाजूला तो अखंड दगडाचा कोनाडा आहे, त्यात प्रथम श्रींची वस्ती होती. मंदिराला घुमट असून त्याला सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे. पाठीमागे पश्चिमेस देवाचे तळे आहे. या तळयाला उन्हाळयाचे दोन महिने सोडून भरपूर पाणी असते. आतील सभामंडप ८' x ८' असा चौरस आहे. त्याच्या वरच्या गोल घुमटाची उंची २०-२५

फूट असावी. मंदिराचा गाभारा पेशवेकालीन असून तो हेमांडपंथी आहे. मूळ गाभा-यात प्रवेश करताना दगडी कोरीव ऋदद्धिसिद्धीच्या मूर्ती आहेत. दोन्ही बाजूच्या कोनाडयात गणपतीच्या दोन मूर्ती आहेत, त्यापैकी उजव्या बाजूची साधी असून शेंदूरचर्चित आहे. प्रवेश करताना वरच्या बाजूलाही गणेशाची मूर्ती दिसते. बाहेरचा सभामंडळप ४०′ x ४०′ एवढा औरसचौरस असून चौफेर गॅलरीसारखी माडी आहे. या सभामंडपात सहा खांब आहेत व छताला हंडयाझुंबरे लटकावलेली आहेत.

## वरद विनायकाची मूर्ती :

मंदिरात दगडी महिरप असून गणेशाची मूर्ती सिंहासनारुढ आहे. या सिंहासनावर दोन हत्ती व मध्ये देवी आहे. गणेशाची मूर्ती दगडी असून तिची सोंड डावीकडे झुकलेली आहे. मूर्ती भंगलेली असल्याचे लक्षात आल्यावर त्या जागी स्थापिलेल्या श्रीगणेशमूर्तीच्या हातात शस्त्रे नाहीत. मिटलेल्या डोळ्यांची मूर्ती आहे.

## नैमित्तीक उत्सव :

अष्टविनायकापैंकी इतर स्थानांप्रमाणेच येथेही भाद्रपद व माघ शुक्ल १ ते ५ पर्यंत उत्सव होतो. या उत्सवाला शेकडो भाविक जमतात; विशेषतः माघातील चतुर्थीचा उत्सव फार मोठया प्रमाणावर होतो.

## पौराणिक कथा :

फार प्राचिन काळी विदर्भामध्ये कौंडिण्य नावाचे गाव होते. तेथे भीष्म नावाचा एक शूर व दानी राजी होऊन गेला. त्याला मूलबाळ नसल्याने तो दुःखी होता. एके दिवशी राज्यकारभार प्रधानावर सोपवून तो आपल्या राणीसह अरण्यात निघून गेला. अरण्यात त्याला विश्वामित्र ऋषीं भेटले. राजाचे दुःख जाणून विश्वामित्र ऋषींनी त्याला एकाक्षर मंत्राचा जप दिला.

त्यानंतर राजा अरण्यातून परतला. राजधानीत आल्यावर दक्षाने बांधलेल्या मंदीरात राजाने एकाक्षरी मंत्राचा जप करुन उग्र तपश्चर्या सुरु केली. त्यामुळे विनायक त्याच्यावर प्रसन्न झाला. “तुला लवकरच पुत्रप्राप्ती होईल” असा त्याने राजाला वर दिला.

काही दिवसांनी राजाला तेजःपुंज आणि सोन्यासारखी कांती असणारा एक पुत्र झाला. त्याचे नाव रुक्मांगद, रुक्मांगद मोठा झाल्यावर राजाने सारा राज्यकारभार त्याच्यावर सोपविला व त्यालाही एकाक्षर मंत्राचा जप करण्यास सांगितले. एकदा रुक्मांगद शिकारीसाठी वनात भटकत असता तो वाचक्नवी ऋषींच्या आश्रमात गेला. ऋषी स्नानाला जाण्याच्या गडबडीत असल्याने त्यांनी रुक्मांगदाला आश्रमात बसावयास सांगून ते स्नानासाठी निघून गेले. त्या ऋषींची पत्नी मुकुंदा ही अतिशय रुपवान होती. रुक्मांगदाला दमल्यामुळे फार तहान लागली होती. त्याने ऋषीपत्नीस पाणी मागितले. पाणी देताना मुकुंदा त्याच्यावर अनुरुक्त झाली, पण रुक्मांगदाने तिची इच्छा पूर्ण केली नाही. त्यामुळे कामविव्हल झालेल्या मुकुंदने " तू कुष्ठरोगी होशील" असा रुक्मांगदाला शाप दिला.

शाप मिळता क्षणीच सुवर्णाप्रमाणे कांती असलेले रुक्मांगदाचे शरीर कुष्ठरोगाने विद्रूप झाले. त्यामुळे दुःखी झालेला रुक्मांगद अरण्यात भटकत असता त्याला नारदमुनी भेटले. त्यांच्या आदेशानुसार रुक्मांगदाने कदंब नगरातील कदंब तीर्थात स्नान केले व तेथील चिंतामणी गणेशाची आराधना केली. त्यामुळे रुक्मांगद रोगमुक्त झाला.

इकडे त्या मुकुंदेची अवस्था लक्षात घेऊन इंद्राने रुक्मांगदाचे रुप घेतले व मुकुंदेची इच्छा पूर्ण केली. त्याच्यापासून मुकुंदेला पुत्र झाला. त्याचे नाव गृत्समद. हाच तो ऋग्वेदातील प्रसिद्ध मंत्रदृष्टा व द्वितीय मंडळाचा कर्ता. गृत्समदाच्या जन्माची कथा सर्वांना माहित झाली होती. त्यामुळे त्याचा पदोपदी पाणउतारा होऊ लागला. मातेच्या पापाचरणामुळे सर्वजण गृत्समदाला हीन लेखू लागले. तेव्हा गृत्समदाने आईकडून सत्य जाणून घेण्यासाठी गेला व आपला पिता कोण हे तिला विचारले. त्यावर तीने 'रुक्मांगद' असे सांगितले. गृत्समद अतिशय चिडला व त्याने तिला शाप दिला – "तू अमाप फळे येणारी कंटकी होशील, पण तुझ्या फळांना एकही प्राणी कधी तोंड लावणार नाही." यावर त्याची आई मुकुंदाही चिडली व तिनेही गृत्समदास शाप दिला – "तुझ्या पोटी एक राक्षस जन्म घेईल आणि तिन्ही लोकांना तो त्रस्त करील." इतक्यात आकाशवाणी झाली – "गृत्समद हा इंद्राचा पुत्र आहे."

शापाची परिणती म्हणून मुकुंदा बोरीचे झाड झाली. गृत्समद पापक्षालनार्थ पुष्पक वनात जाऊन तप करु लागला. त्याने विनायकाची आराधना केली. त्यामुळे विनायक प्रसन्न

झाला. विनायकाने त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा तो म्हणाला, “तू याच वनात वास्तव्य करुन भक्तांच्या इच्छा पूर्ण कर.” विनायकाने ते मान्य केले व त्या वनात राहू लागला. ते पुष्पक किंवा भद्रक वन म्हणजेच आजचे महाड क्षेत्र. या ठिकाणी गृत्समदाला वर मिळाला म्हणून येथील विनायकाला ‘वरद विनायक’ म्हणतात. गृत्समद हा गाणपत्य संप्रदायाचा आद्य प्रवर्तक समजला जातो.

